सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २८९ | शनिवार, दि. ११ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १४२७०० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १३१२०० |
| १८ सोने ७५.००% | ₹ १०८७०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २३९०/- |

भाव प्रती १० ग्रॅम






**ॲड. किरण पाटील**
अमळनेर



**श्री. राजेंद्र भामरे**
निवृत्त ए.सी.पी., पुणे



**प्रा. वसंत देसले**
अमळनेर



**श्री. विनोद पाटील**
अमळनेर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

**संजू सॅमसनला टीम इंडियातून बाहेर का केले?**
-पान २

# ब्रिटीशकालीन न्यायालयाची इमारत जतन करा

## पुरातत्त्व विभागातर्फे अमळनेर पालिका मुख्याधिकाऱ्यांना पत्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील ऐतिहासिक वारसा असलेल्या ब्रिटीशकालीन न्यायालय इमारतीचे तातडीने जतन व संवर्धन करावे, तसेच पालिका स्तरावर हेरिटेज समिती स्थापन करण्यासाठी ठोस कार्यवाही करावी, अशा सूचना पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संचालक अमोल गोटे यांनी येथील पालिका मुख्याधिकाऱ्यांना पत्राद्वारे दिल्या आहेत.

या पत्रात म्हटले आहे, की १५ ऑगस्ट १९४२ रोजी अमळनेरमध्ये स्वातंत्र्य चळवळीच्या पार्श्वभूमीवर रेल्वेस्थानक, टपाल कार्यालय, न्यायालय आणि इतर शासकीय इमारती जाळण्यात आल्या होत्या. त्या काळातील देशातील सर्वांत मोठ्या जळीतकांडांपैकी ही एक घटना मानली जाते. या घटनेनंतर अमळनेरवर दीड लाख रुपये दंडही आकारण्यात आला होता. त्या ऐतिहासिक घटनेची साक्ष देणारे ब्रिटीशकालीन न्यायालयाचे अवशेष अर्थात इमारती आजही अस्तित्वात आहेत. खानदेश इतिहास परिषद आणि इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे यांनी या इमारतीच्या दुरवस्थेबाबत पुरातत्त्व विभागाकडे पत्र पाठवून लक्ष वेधले होते.



*अमळनेर : शहरातील ऐतिहासिक वारसा लाभलेली ब्रिटीशकालीन न्यायालयाची इमारत.*

खानदेश इतिहास परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय पाटील आणि सचिव प्रा. डॉ. विलास पाटील यांनी पत्रात म्हटले आहे, की ही ऐतिहासिक इमारत सध्या खासगी मालमत्ता म्हणून वापरली जात असून तेथे जनावरे बांधली जातात तसेच चारा साठवला जात आहे. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. ब्रिटिशांच्या गुलामगिरीविरुद्ध अमळनेरकरांनी दिलेल्या लढ्याचे, देशप्रेमाचे, धैर्याचे आणि शौर्याचे हे न्यायालय प्रतीक आहे. ही इमारत राज्य संरक्षित स्मारकांच्या यादीत नसली, तरी ती असंरक्षित ऐतिहासिक स्मारक आहे. महाराष्ट्र शासनाच्या १९८२ च्या परिपत्रकानुसार केंद्र संरक्षित, राज्य संरक्षित तसेच असंरक्षित अशा कोणत्याही पुरातत्त्व स्मारकाची हानी होणार नाही, याची काळजी घेणे संबंधित स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, अमळनेरमध्ये या ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनासाठी आवश्यक ती पावले उचलली गेली नसल्याचे दिसून येत आहे.

युनिफाईड डेव्हलपमेंट कंट्रोल ॲण्ड प्रमोशन रेग्युलेशन्स (यूडीसीपीआर) अंतर्गत अशा ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनासाठी महापालिका, नगर परिषद किंवा नगरपालिकेत हेरिटेज समिती स्थापन करणे अपेक्षित आहे. मात्र, अमळनेर नगर परिषदेत अद्याप अशी समिती अस्तित्वात नसल्याने ती तातडीने स्थापन करावी, तसेच शासनाच्या परिपत्रकानुसार या ऐतिहासिक इमारतीच्या जतन व संवर्धनासाठी आवश्यक कार्यवाही करून नामनिर्देशित वास्तुविशारदांची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या कामासाठी नाशिक विभागाच्या पुरातत्त्व विभागाकडून आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येईल, असेही सहाय्यक संचालक गोटे यांनी पत्रात स्पष्ट केले आहे.






*अमळनेर : माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभाग आणि राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस यांच्या वतीने वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना अन्नदान करताना जळगाव जिल्हाध्यक्ष सनी गायकवाड, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष कृष्णा बोरसे, ललित बाविस्कर, विद्यार्थी काँग्रेसचे कार्याध्यक्ष मनीष देसले, उपाध्यक्ष हुझेफा पठाण, तालुका उपाध्यक्ष प्रणव चौधरी, युवक शहर कार्याध्यक्ष चैतन्य संदानशीव, अमळगाव येथील युवा नेते योगेश पाटील, सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष करण साळुंखे, जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानदीप सांगोरे, सोशल मीडिया शहराध्यक्ष रोहित सूर्यवंशी, प्रताप महाविद्यालय विद्यार्थी अध्यक्ष कुशन पाटील, विद्यार्थी सरचिटणीस तुषार ठाकरे आदी.*

# आमदार अनिलदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमात अन्नदान

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभाग व राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचा सेवाभावी उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभाग आणि राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस यांच्या वतीने वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना नुकताच अन्नदानाचा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या निधनामुळे तसेच अमळनेर येथील संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थान येथे लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर आमदार अनिलदादा पाटील यांनी यंदा वाढदिवस साजरा न करण्याचा संवेदनशील निर्णय घेतला होता. त्यांच्या या भूमिकेचा आदर राखत कोणताही जल्लोष न करता समाजोपयोगी उपक्रमाद्वारे वाढदिवसाचे औचित्य साधण्यात आले.

यावेळी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना प्रेमपूर्वक भोजनाचे वाटप करण्यात आले. समाजाप्रती असलेली बांधिलकी, सेवाभाव आणि माणुसकी जपण्याची प्रेरणा आमदार अनिलदादा पाटील यांच्या कार्यातूनच मिळते. त्यांच्या सेवाभावी विचारांतून प्रेरणा घेत हा उपक्रम राबविण्यात आला, असे जळगाव जिल्हाध्यक्ष सनी गायकवाड यांनी सांगितले. यावेळी आमदार पाटील यांना उत्तम आरोग्य, निरोगी दीर्घायुष्य लाभावे आणि त्यांच्या हातून जनसेवेचे कार्य अधिक जोमाने व व्यापक स्वरूपात घडत राहावे, अशा सदिच्छा राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष कृष्णा बोरसे यांनी व्यक्त केल्या.

या उपक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभागाचे जळगाव जिल्हाध्यक्ष सनी गायकवाड, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष कृष्णा बोरसे, ललित बाविस्कर, विद्यार्थी काँग्रेसचे कार्याध्यक्ष मनीष देसले, उपाध्यक्ष हुझेफा पठाण, तालुका उपाध्यक्ष प्रणव चौधरी, युवक शहर कार्याध्यक्ष चैतन्य संदानशीव, अमळगाव येथील युवा नेते योगेश पाटील, सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष करण साळुंखे, जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानदीप सांगोरे, सोशल मीडिया शहराध्यक्ष रोहित सूर्यवंशी, प्रताप महाविद्यालय विद्यार्थी अध्यक्ष कुशन पाटील, विद्यार्थी सरचिटणीस तुषार ठाकरे, तसेच यश पवार, समीर शेख, यश शेटे, अजय पवार आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत श्री सखाराम महाराजांची वारी पिशोरहून चिखलठाणाकडे मार्गस्थ

## 'ज्ञानोबा-तुकाराम' आणि 'संत श्री सखाराम महाराज की जय' असा जयघोष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थानातर्फे प. पू. प्रसाद महाराज यांच्या नेतृत्वात निघालेल्या आषाढी पायी वारीचा प्रवास गुरुवार, दि. ९ जुलै रोजी नियोजित वेळेनुसार पिशोर येथून चिखलठाणाकडे भक्तिमय वातावरणात सुरू झाला. सकाळपासूनच वारकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. दुपारी ११ वाजता दिंडीने पिशोर येथून प्रस्थान केले. यावेळी ३५० वारकऱ्यांच्या जयघोषाने परिसर दुमदुमला होता.

पिशोरहून निघालेली दिंडी भारंबा टांडा, जैतखेडा आणि वडाळी मार्गे सुमारे २३ किलोमीटरचा टप्पा पूर्ण करत चिखलठाण येथे मुक्कामी पोहोचणार आहे. संपूर्ण मार्गावर हरिनामाचा अखंड गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि विठ्ठल नामस्मरणाने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. यंदाच्या दिंडीत सुमारे ३५० वारकरी सहभागी झाले असून, 'ज्ञानोबा-तुकाराम' आणि 'संत श्री सखाराम महाराज की जय' या जयघोषांनी वातावरण दुमदुमून गेले आहे. वारकरी भक्तिभावाने विठ्ठलाचे नामस्मरण करत शिस्तबद्ध पद्धतीने पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. वारी मार्गावरील गावांमध्ये वारकऱ्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत असून, विविध सामाजिक संस्था, ग्रामस्थ आणि सेवाभावी मंडळांकडून पिण्याच्या पाण्याची, अल्पोपहाराची तसेच वैद्यकीय सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. संत श्री सखाराम महाराज संस्थानातर्फे संपूर्ण पालखी सोहळ्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यात येत असून, वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसह सर्व आवश्यक सुविधांवर विशेष लक्ष दिले जात आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठ्ठल-रुक्मिणींच्या दर्शनाची ओढ मनात साठवून वारकरी आनंद, उत्साह आणि भक्तिभावाने पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहेत. संत श्री सखाराम महाराजांच्या नामगजराने आणि हरिनामाच्या अखंड ध्यासाने संपूर्ण वारी सोहळा भक्तिमय वातावरणात पुढे सरकत आहे.





*अमळनेर : येथील संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थानातर्फे प. पू. प्रसाद महाराज यांच्या नेतृत्वात गुरुवार, दि. ९ जुलै रोजी पिशोरहून चिखलठाणाकडे मार्गस्थ झालेली आषाढी पायी वारी.*

# आषाढी वारी : वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी विशेष वैद्यकीय पथक

## जळगाव जि. प.च्या आरोग्य विभागाकडून राबविल्या जाताहेत प्रभावी उपाययोजना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आषाढी वारीनिमित्त येथील संत श्री सखाराम महाराज विठ्ठल-रुक्मिणी वाडी संस्थानाच्या पायी पालखी सोहळ्यासोबत वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी जिल्हा परिषद, जळगावच्या आरोग्य विभागाने विशेष वैद्यकीय पथकाची प्रतिनियुक्ती केली आहे. पंढरपूर यात्रेदरम्यान वारकऱ्यांना तातडीची वैद्यकीय मदत, प्रथमोपचार, औषधोपचार तसेच साथरोग प्रतिबंधक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी या पथकावर सोपविण्यात आली आहे.

या पथकात समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. जय भाऊसाहेब देशमुख, आरोग्य सेवक प्रथमेश संतोष पाटील, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. घनश्याम लक्ष्मण पाटील तसेच आरोग्य कर्मचारी उपेंद्र दहिवद यांचा समावेश असून, पालखीसोबत संपूर्ण प्रवासात ते वारकऱ्यांना आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देत आहेत. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पथकाने आवश्यक औषधसाठा सोबत ठेवला असून ताप, सर्दी, जुलाब, उलट्या, वेदना, ॲलर्जी आणि संसर्गजन्य आजारांवरील विविध औषधे, इंजेक्शने, सलाईन, ओआरएस, कापूस, बँडेज, सिरिंज आदी साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. रुग्णांची दैनंदिन नोंद, औषध वितरण, रोगनिहाय उपचारांची माहिती रजिस्टरमध्ये नोंदविणे तसेच प्रतिनियुक्ती संपल्यानंतर वैद्यकीय अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. वारीदरम्यान आरोग्य पथकाने पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेवरही विशेष लक्ष केंद्रित केले आहे. सडावण, पारोळा, आडगाव, भडगाव आणि नगरदेवळा येथील मुक्कामस्थळी टँकर व नळाच्या पाण्याची नियमित तपासणी करण्यात आली. ऑर्थो टोलिडीन (ओटी) चाचणीद्वारे क्लोरीनची पातळी तपासून निर्जंतुकीकरणाची खात्री करण्यात आली. भडगाव येथे टँकरच्या पाण्यात दुर्गंधी आढळून आल्याने तातडीने क्लोरीन टाकून पाणी शुद्धीकरणाची कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर संबंधितांना पाणी वापराबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या.

पालखी सोडण्यापूर्वी दुसऱ्या अधिकारी अथवा कर्मचाऱ्याकडे विधिवत कार्यभार सोपविणे बंधनकारक करण्यात आले असून, आदेशाचे पालन न केल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असल्याचेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. आषाढी वारीदरम्यान हजारो वारकऱ्यांच्या आरोग्याचे संरक्षण, सुरक्षित पिण्याचे पाणी, साथरोग प्रतिबंध आणि तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध राहावी, यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाने केलेली ही व्यवस्था यात्रेच्या यशस्वी आणि सुरक्षित आयोजनासाठी महत्त्वाची ठरत आहे.

**स्वच्छतेसाठी फिरते शौचालय व स्नानगृहाची सुविधा**

ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद, जळगाव यांच्यामार्फत कार्यकारी अभियंता राहुल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली, कनिष्ठ अभियंते ऋषिकेश देशमुख, संदीप पाटील, विश्वजीत पाटील तसेच विभागातील इतर सहकाऱ्यांच्या देखरेखीखाली अमळनेर ते पंढरपूर या पालखी मार्गावर वारकऱ्यांसाठी २५ फिरती शौचालये व २५ स्नानगृहे कार्यान्वित करण्यात आली आहेत. या सर्व सुविधांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा तसेच वापरासाठी आवश्यक पाण्याचा नियमित पुरवठा करण्यात येत असून, वारकऱ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामुळे मार्गातील मुक्कामस्थळी वारकऱ्यांना स्वच्छतागृह व स्नानाची सुविधा मिळत असून, उघड्यावर शौचास जाण्याचे प्रमाण कमी होण्यास तसेच संसर्गजन्य आजारांचा धोका टाळण्यास मदत होत आहे. वैद्यकीय सेवा, पिण्याच्या पाण्याची तपासणी, औषधोपचार आणि स्वच्छता सुविधा यांचा समन्वय साधून वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ व निरोगी वारीचा अनुभव मिळावा, यासाठी आरोग्य विभागाकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे

> आषाढी वारी ही केवळ पायी यात्रा नसून सेवा, श्रद्धा आणि समर्पणाची परंपरा आहे.
>
> 
>
> वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी जळगाव जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने वैद्यकीय पथक, औषधसाठा, पाणी तपासणी तसेच फिरते शौचालय व स्नानगृहाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सेवेमुळे वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि निरोगी वातावरणात विठूरायांच्या दर्शनाचा लाभ घेता येईल. या सेवेत सहभागी झालेल्या सर्व अधिकारी, कर्मचारी आणि सेवाभावी व्यक्तींचे संस्थानातर्फे मनःपूर्वक आभार.
>
> **- प. पू. प्रसाद महाराज,** गादीपुरुष,
> संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थान, अमळनेर.

## संपादकीय

## सहकारी विमा कंपनी की राजकीय छत्री ?

केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन केल्यापासून देशभरात फार मोठे परिवर्तन घडून येत असल्याचा दावा केला जातो आहे. सहकाराच्या माध्यमातून सामान्यातील सामान्य माणसाला सहजपणाने अधिकाधिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा प्रयत्न दिसतो. सहकाराच्या माध्यमातून सामान्य माणसाच्या जीवनात समृद्धी निर्माण करण्याचा प्रमुख हेतू असल्याचे केंद्रीय सहकार मंत्र्यांकडून वारंवार सांगितले जात आहे. अलीकडेच देशपातळीवर सहकार दिन साजरा झाला. आणि त्याच्या मुख्य कार्यक्रमात बोलताना केंद्रीय सहकार मंत्र्यांनी घोषणा केली. ती म्हणजे सहकारी तत्त्वावर विमा व्यवसाय सुरू केला जाणार आहे. ही घोषणा जर प्रत्यक्षात येणार असेल, तर तो जागतिक स्तरावरचासुद्धा पहिला प्रयत्न ठरू शकतो. आज जगभर किंवा भारतातसुद्धा विमा क्षेत्रात खासगी कंपन्यांची मक्तेदारी आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळ किंवा नॅशनल इश्युरन्स कंपनी यासारख्या सरकारची सर्वाधिक भागीदारी असलेल्या कंपन्यांशिवाय इतर खासगी कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर आपला जम बसवलेला आहे. सरकारला सहकारी क्षेत्रात विमा व्यवसाय सुरू करण्याची आवश्यकता का वाटावी? याचादेखील विचार महत्त्वाचा ठरतो. ज्याअर्थी सरकार विम्यासारख्या अतिशय महत्त्वाच्या क्षेत्रात सहकार तत्त्वाचा अवलंब करणार असेल तर सध्याच्या विमा कंपन्यांपेक्षा अधिक लोकाभिमुख विमा व्यवसाय सरकारला अभिप्रेत आहे हे स्पष्ट होते. सध्याच्या विमा कंपन्या या पूर्णपणे व्यावसायिक तत्त्वावर काम करतात. प्रचंड नफा कमावणे हाच त्यांचा उद्देश असतो. अशा परिस्थितीत जर सहकारी तत्त्वातून विमा व्यवसायाला बळ मिळणार असेल तर ते निश्चितच उपयुक्त ठरू शकते. परंतु या सहकारी विमा कंपनीचे स्वरूप ना नफा ना तोटा हे उद्दिष्ट ठेवूनच तयार केले गेले पाहिजे.

सरकारचा हेतू चांगलाच आहे. परंतु एकूणच सध्याचे सहकार क्षेत्राचे स्वरूप लक्षात घेतले तर अशा प्रकारची विमा कंपनी यशस्वी होण्याकरीता सरकारला बरीच मोठी भांडवली गुंतवणूक करावी लागेल. प्रामुख्याने ही सहकारी विमा कंपनी सहकारी संस्थांच्या सभासदांना विमा कवच उपलब्ध करून देईल. असे असेल तर ते कवच सहकारी बँकांच्या खातेदारांनाही उपलब्ध झाले पाहिजे. आज देशभरात सहकारी बँकांचे खूप मोठे जाळे आहे. या सहकारी बँका देशभरात २७ लाख कोटींचा व्यवसाय करतात. म्हणजे एकूणच भारताच्या अर्थव्यवस्थेत सहकारी बँकांच्या उलाढालीचा तेवढाच मोठा वाटा आहे. राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षाही सहकारी बँकांमधील व्यवहार सामान्य माणसाला अधिक सोयीचे आणि जवळचे वाटत असतात. विशेष म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांपेक्षा सहकारी बँकांचा विस्तार अधिक वेगाने होताना दिसून येतो. आज या बँकांमधील उलाढालीचा आकडा बघितला तर त्या सार्वजनिक बँकांशी चांगली स्पर्धा करू शकतात हे त्यातून सिद्ध होते. म्हणजे आतापर्यंत सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकार तत्त्वावरचे बाजार, अशा अनेक क्षेत्रांत हे सहकार तत्त्व यशस्वी झालेले आहे. यातून सर्वसामान्य माणसाला थेट लाभ मिळत राहतात. याच प्रमुख धोरणाचा विस्तार सहकारी विमा कंपनीच्या माध्यमातून होऊ शकतो. मात्र या कंपनीचा व्यवहार हा पूर्णपणे सहकारी तत्त्वावर चालला पाहिजे. सरकारी नियंत्रण असलेली सहकारी विमा कंपनी असे त्याला स्वरूप येता कामा नये. बऱ्याच सहकारी संस्थांचे दिवाळेही निघत असते. किंबहुना अनेक ठिकाणी सहकाराच्या नावाने स्वाहाकार सुरू असतो. हा अनुभव लक्षात घेऊन या सहकारी विमा कंपनीची उभारणी करावी लागेल. विशेषत:

आजच्या या सहकार क्षेत्रावर राजकारण्यांचे सर्वाधिक वर्चस्व पाहायला मिळते. मग साखर कारखाने असो, सहकारी बँका असो किंवा अगदी पतपेढ्या असो. एवढेच नव्हे तर गावपातळीवरची सहकारी दूध संघ किंवा विविध कार्यकारी सोसायट्या असतात. त्यासुद्धा स्थानिक पुढाऱ्यांच्याच ताब्यात असल्याचे पाहायला मिळते. सहकारावरचा हा राजकीय प्रभाव दुर्लक्षित करता येत नाही. तसा प्रकार या सहकारी विमा कंपनीबाबत होता कामा नये. अन्यथा ती सहकारी राजकीय विमा कंपनी ठरू शकेल. आज देशभरामध्ये या सहकारी धोरणाचा वेगवेगळ्या पद्धतीने उपयोग केला जातो आहे. सरकारनेच सहकारी तत्त्वावरची भारत टॅक्सी सेवा सुरू केली आहे. दिल्ली आणि अहमदाबाद या ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर सुरू आहे. तिला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन आता देशाच्या पाचशे शहरांमध्ये ही सहकारी भारत टॅक्सी सेवा सुरू होणार आहे. अन्य टॅक्सीसेवांपेक्षा याचे वेगळेपण अधिक स्पष्ट झाले पाहिजे. मग कमी भाड्यातली सेवा आणि ओला उबेरला स्पर्धा करू शकेल अशी तत्पर सेवासुद्धा दिली गेली पाहिजे. स्वाभाविकपणे सहकारी विमा कंपनी स्थापन झाल्यानंतर त्याचा लाभ या टॅक्सी चालकांनाही होऊ शकेल. सहकारी विमा कंपनीचा सर्वाधिक लाभ हा खरे तर देशभरात काही कोटींच्या संख्येत असलेल्या गृहनिर्माण संस्थांना होईल. कारण गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांची संख्या प्रचंड मोठी आहे. त्यांनादेखील या सहकारी विमा कंपनीचे लाभउपलब्ध होऊ शकतात. थोडक्यात सांगायचे तर सहकारी संस्थांच्या अनेक सभासदांची हमी ही विमा कंपनी घेईल, पण या विमा कंपनीची हमी सरकार घेणार आहे का? हेसुद्धा स्पष्ट व्हायला हवे. सरकारने विचारपूर्वक विमा क्षेत्र निवडलेले दिसते. त्यात सामान्य माणसाचे हित नेमके कोणत्या आणि कशा पद्धतीने जपले जाईल हे येणाऱ्या काळात कळेल. सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रातल्या विमा कंपन्यांमध्ये सरकारला थेट हस्तक्षेप करता येत नाही. सहकार क्षेत्रात मात्र ही संधी सरकारला साधता येईल. म्हणून ही विमा कंपनी राजकीय छत्री होऊ नये एवढीच अपेक्षा आहे.

# ब्रह्मपूर-उधना 'अमृत भारत एक्स्प्रेस' आता दररोज

## खानदेश आणि विदर्भातील अनेक महत्त्वाच्या शहरांना मिळाली थेट जोडणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : भुसावळ-उधना मार्गावरून धावणारी उधना-ब्रह्मपूर 'अमृत भारत एक्स्प्रेस' यापूर्वी तीन दिवस चालवली जात होती. मात्र, आता ही गाडी गुरुवार, दि. ९ जुलैपासून दररोज धावण्यास सुरूवात झाली आहे. उत्तर महाराष्ट्रातील हजारो प्रवासी, कामगार मोठ्या प्रमाणावर उधना, सुरत आणि आसपासच्या औद्योगिक भागात कामासाठी जातात. त्यांच्यासाठी सुरक्षित, जलद आणि परवडणारा प्रवास हा नेहमीच महत्त्वाचा मुद्दा राहिला आहे. उधना-ब्रह्मपूर 'अमृत भारत एक्स्प्रेस' आता दररोज सुरू झाल्याने संबंधित प्रवाशांची मोठी सोय झाली आहे

रेल्वे मंत्रालयाने १९०२१/१९०२२ उधना-ब्रह्मपूर-उधना 'अमृत भारत एक्स्प्रेस'च्या फेऱ्यांची वारंवारता वाढविण्यास मंजुरी दिली आहे; यानुसार ही सेवा आता दैनिक गाडीमध्ये रूपांतरित करण्यात आली आहे. नव्या निर्देशानुसार गाडी क्रमांक १९०२१ उधना-ब्रह्मपूर 'अमृत भारत एक्स्प्रेस' जी सध्या उधना येथून रविवार, बुधवार आणि शुक्रवारी सुटत होती, ती आता दररोज सकाळी ७.१० वाजता उधना येथून सुटेल. त्याचप्रमाणे गाडी क्रमांक १९०२२ ब्रह्मपूर-उधना 'अमृत भारत एक्स्प्रेस' जी सध्या ब्रह्मपूर येथून सोमवार, गुरुवार आणि शनिवारी सुटत होती ती देखील आता दररोज रात्री ११.४५ वाजता ब्रह्मपूर येथून सुटेल.

ही गाडी नंदुरबार, अमळनेर, धरणगाव, जळगाव, भुसावळ आणि नागपूर मार्गे धावत असल्याने खानदेश आणि विदर्भातील अनेक महत्त्वाच्या शहरांना थेट जोडणी मिळाली आहे. केवळ कामगारच नव्हे, तर विद्यार्थी, व्यावसायिक आणि कुटुंबासह प्रवास करणाऱ्यांना या गाडीचा मोठा फायदा होईल.

### २२ पैकी तब्बल ११ डबे जनरल

१९०२१/१९०२२ उधना-ब्रह्मपूर-उधना अमृत भारत एक्स्प्रेसचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या गाडीला एकूण २२ डबे जोडले गेले आहेत. आणि त्यापैकी तब्बल ११ डबे हे जनरल म्हणजेच सर्वसाधारण स्वरूपाचे आहेत. याशिवाय ८ शयनयान आणि २ डबे अपंगांसाठी राखीव आहेत. लांबपल्ल्याच्या प्रवासाला निघालेल्या प्रवाशांसाठी १ पॅन्ट्री कार देखील एक्स्प्रेससोबत आहे. दरम्यान, तब्बल ११ जनरल डबे असलेल्या प्रवाशांना त्यातून आरक्षणाशिवाय प्रवास करता येत आहे. लांबपल्ल्याच्या गाड्यांमधील नेहमीची गर्दी लक्षात घेता खानदेशातील प्रवाशांना त्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

### असे आहे दोन्ही बाजूंचे वेळापत्रक

१९०२१ उधना-ब्रह्मपूर 'अमृत भारत एक्स्प्रेस' उधना येथून दररोज सकाळी ७.१० वाजता सुटल्यानंतर वाटेत नवापूर स्थानकावर ८.२८ वाजता, नंदुरबार स्थानकावर ९.३५ वाजता, दोंडाईचा स्थानकावर १०.०३ वाजता, शिंदखेडा स्थानकावर १०.२३ वाजता, अमळनेर स्थानकावर ११.०३ वाजता, धरणगाव स्थानकावर ११.३८ वाजता, जळगाव स्थानकावर दुपारी १२.३२ आणि भुसावळ स्थानकावर दुपारी १ वाजता पोहचल्यानंतर पुढील प्रवासाला मार्गस्थ होईल. त्याचप्रमाणे १९०२२ ब्रह्मपूर-उधना अमृत भारत एक्स्प्रेस ब्रम्हपूर येथून दररोज रात्री ११.४५ वाजता सुटल्यानंतर वाटेत भुसावळ स्थानकावर तिसऱ्या दिवशी पहाटे २ वाजता, जळगाव स्थानकावर २.३८ वाजता, धरणगाव स्थानकावर ३.३० वाजता, अमळनेर स्थानकावर ३.४८ वाजता, शिंदखेडा स्थानकावर ४.२३ वाजता, दोंडाईचा स्थानकावर ४.४३ वाजता, नंदुरबार स्थानकावर ५.२५ वाजता आणि नवापूर स्थानकावर सकाळी ६.२६ वाजता पोहचल्यानंतर पुढील प्रवासाला मार्गस्थ होईल.

# जळगाव ते इंदूर विमानसेवेच्या हालचालींना पुन्हा आला वेग; कधी सुरूवात होणार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : जळगाव विमानतळावरून इंदूरसाठी थेट विमानसेवा सुरू करण्याच्या हालचालींना पुन्हा एकदा वेग आला आहे. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील व्यापारी, औद्योगिक तसेच शैक्षणिक संपर्क अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाणारी ही सेवा सुरू करण्यासाठी फ्लाय ९१ या विमान कंपनीने नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडे (डीजीसीए) तिसऱ्यांदा प्रस्ताव सादर केला आहे. त्यामुळे जळगाव-इंदूर विमानसेवा लवकरच प्रत्यक्षात येण्याची शक्यता पुन्हा निर्माण झाली आहे.

यापूर्वी मार्च महिन्यात फ्लाय ९१ कंपनीने जळगाव-इंदूर मार्गावर विमानसेवा सुरू करण्याची घोषणा केली होती. या घोषणेनंतर जळगावकरांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र, त्यानंतर अलायन्स एअर कंपनीनेही या मार्गावर सेवा सुरू करण्याची तयारी दर्शवत २ मेपासून दिल्ली-इंदूर-जळगाव आणि परतीची जळगाव-इंदूर-दिल्ली अशी विमानसेवा सुरू करण्याची घोषणा केली होती. कंपनीने या मार्गावरील विमान भाडे आणि उड्डाणाचे वेळापत्रकही जाहीर केले होते.

### अलायन्सनंतर फ्लाय ९१ चाही पाठपुरावा

अलायन्स एअरच्या नियोजनानुसार जळगाव-इंदूर-दिल्ली अशी विमानसेवा आठवड्यातून तीन दिवस, म्हणजे मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी उपलब्ध होणार होती. त्यामुळे जळगावमधील व्यावसायिक, उद्योजक, विद्यार्थी तसेच प्रवाशांना इंदूरमार्गे दिल्लीसह उत्तर भारताशी थेट हवाई संपर्क उपलब्ध होण्याची अपेक्षा होती. मात्र, विमानांच्या उपलब्धतेअभावी ही सेवा नियोजित तारखेला सुरू होऊ शकली नाही. कंपनीने सुरूवातीला तीन आठवड्यांचा विलंब जाहीर केला होता. त्यानंतरही सेवा सुरू न झाल्याने नवीन वेळापत्रकासह सुधारित प्रस्ताव नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडे सादर करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, फ्लाय ९१ कंपनीनेही जळगाव-इंदूर मार्गाबाबतचा आपला पाठपुरावा कायम ठेवला आहे. कंपनीने पावसाळी हंगामाच्या वेळापत्रकात या मार्गाचा समावेश करण्यासाठी पुन्हा एकदा नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

### अंतिम मंजुरीकडे जळगावकरांचे लक्ष

जळगाव आणि इंदूर या दोन्ही शहरांमध्ये व्यापारी, औद्योगिक, वैद्यकीय आणि शैक्षणिक कारणांमुळे मोठ्या प्रमाणावर प्रवास होत असतो. सध्या या मार्गासाठी रस्ते किंवा रेल्वे प्रवासावर अवलंबून राहावे लागते. थेट विमानसेवा सुरू झाल्यास हा प्रवास अवघ्या काही वेळात पूर्ण होणार असून, दोन्ही शहरांतील व्यापार, उद्योग, पर्यटन आणि गुंतवणुकीलाही चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जळगाव विमानतळावरून सध्या हैदराबादसह गोवा, अहमदाबाद, पुणे आणि मुंबई या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध आहे. दिल्लीसह इंदूर मार्ग नव्याने सुरू झाल्यास उत्तर आणि मध्य भारताशी जळगावचा हवाई संपर्क अधिक मजबूत होणार असून, भविष्यात अन्य शहरांसाठीही नवीन विमानसेवा सुरू करण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आता 'डीजीसीए'च्या अंतिम मंजुरीकडे जळगाव शहर व जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# खरीप पेरण्यांना वेग; तालुक्यात ४८ हजार हेक्टरवर लागवड पूर्ण

## १४१.०२ मिलिमीटर पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा; कपाशी, मक्याचे क्षेत्र आघाडीवर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यात यंदा अद्याप तरी पावसाने समाधानकारक हजेरी लावली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पेरण्यांनी वेग घेतला आहे. आतापर्यंत तालुक्यात ४८ हजार ४१० हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची लागवड पूर्ण झाली आहे. यात कपाशी व मका या पिकांचे क्षेत्र सर्वाधिक आहे. आतापर्यंत तालुक्यात १४१.०२ मिलिमीटर पावसाची नोंद झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार तालुक्यात कपाशी- ३४ हजार ८६ हेक्टर, मका-१२ हजार ५६ हेक्टर, भुईमूग ६३५ हेक्टर, तूर ५०८ हेक्टर, बाजरी २३७ हेक्टर, ज्वारी १२१ हेक्टर, सोयाबीन ११६ हेक्टर, तीळ २ हेक्टर तसेच इतर पिकांची लागवड झाली आहे. यामुळे एकूण खरीप पेरणीचे क्षेत्र ४८ हजार ४१० हेक्टर झाले आहे.

यंदा पावसाचे आगमन तुलनेने वेळेत झाल्यानंतर सुरूवातीला पावसाने काहीशी उघडीप दिली होती. मात्र, गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळे जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाला असून, बहुतांश शेतकऱ्यांनी पेरणीची कामे पूर्ण केली आहेत. विशेषतः कपाशी व मक्याकडे शेतकऱ्यांचा कल कायम असल्याचे चित्र दिसून येत आहे. पुढील काही दिवसांतही पावसाची सातत्यपूर्ण साथ मिळाल्यास पिकांची उगवण चांगली होऊन वाढीस पोषक वातावरण निर्माण होईल. मात्र पावसात दीर्घ खंड पडू नये, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. सध्या पिकांची उगवण सुरू झाली असून, शेतकरी तणनियंत्रण, खत व्यवस्थापन आणि कीड-रोग नियंत्रणाच्या नियोजनाला लागले आहेत. कृषी विभागाने शेतकऱ्यांना हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन आवश्यक कृषी कामे करण्याचे तसेच पिकांची नियमित पाहणी करून तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार व्यवस्थापन करण्याचे आवाहन केले आहे.




# एक पांढरा केस तोडल्यावर १० पांढरे केस उगवतात...

## डर्मेटॉलॉजिस्ट काय म्हणतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'एक पांढरा केस तोडल्यावर १० पांढरे केस उगवतात,' असे आपल्या घरातील अनेक मोठी माणसे सांगत असतात. मात्र खरोखर एक पांढरा केस तोडल्यावर १० पांढरे केस उगवतात का...? याबाबत डर्मेटॉलॉजिस्टचे काय मत आहे? डर्मेटॉलॉजिस्टनुसार पांढरा केस तोडल्यास त्याच्या जागी फक्त एकच नवीन केस उगवतो, त्याची संख्या वाढत नाही. मानवी डोक्यावरील प्रत्येक केसाचे मूळ स्वतंत्र असते. एका मुळातून एकच केस येतो. एका मुळातील केस तोडल्याने



आजूबाजूच्या केसांच्या मुळांवर किंवा त्यांच्या रंगावर कोणताही परिणाम होत नाही. केस पांढरे होणे हे मेलॅनिन या रंगद्रव्याचे उत्पादन कमी झाल्यामुळे घडते. केसांचा रंग बदलणे ही प्रक्रिया अनुवांशिकता आणि वाढत्या वयासारख्या अंतर्गत घटकांवर अवलंबून असते. या नैसर्गिक प्रक्रियेवर बाहेरून केस तोडण्याचा कोणताही परिणाम होत नाही. वारंवार पांढरा केस उपटल्यास त्या विशिष्ट केसाच्या मुळाला नुकसान पोहोचू शकते. यामुळे त्या विशिष्ट जागेवर भविष्यात केस उगवणे कायमस्व यता असते.

# पूज्य किरीट भाईजी १५ जुलैला जळगावात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त पूज्य ऋषिवर किरीट भाईजी यांचे बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी जळगाव शहरात आगमन होत आहे. त्यांच्या प्रत्यक्ष सान्निध्यात गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन तुलसी परिवाराद्वारे करण्यात आले आहे.


हा भक्तिमय कार्यक्रम छत्रपती संभाजी महाराज नाट्यगृह, येथे सकाळी ९ ते १२ या वेळेत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात पूज्य किरीट भाईजी यांचे स्वागत, गुरुपूजन, गुरुवंदना, आशीर्वचन, ठाकुरजी पूजन, शंका समाधान व प्रश्नोत्तर सत्र, गुरु दीक्षा, प्रत्यक्ष दर्शन तसेच प्रसाद वितरण आदी विविध धार्मिक कार्यक्रमांचा समावेश आहे.पवित्र भावनेतून गुरुपौर्णिमा महोत्सव साजरा करण्यात येणार असल्याचे कार्यक्रमाच्या आयोजकांनी सांगितले.

# संजू सॅमसनला टीम इंडियातून बाहेर का केले?

## अखेर गौतम गंभीरने सांगितले कारण; म्हणाला, "आम्ही त्याला स्पष्ट सांगितले..."

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताचा संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये ५ टी-२० सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. त्यानंतर झालेल्या पुढील दोन्ही सामन्यांमध्ये भारतीय संघाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला आहे. मालिकेतील तिसरा सामना मंगळवारी ट्रेंट ब्रिजच्या मैदानावर पार पडला. हा आतापर्यंतचा भारताचा सर्वात लाजीरवाणा पराभव ठरला. पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या इंग्लंडने २०१ धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाचा डाव अवघ्या ७६ धावांवर आटोपला. यासह भारतीय संघाने हा सामना १२५ धावांनी गमावला. या सामन्यातही संजू सॅमसनला प्लेईंग ११ मध्ये स्थान दिले गेले नव्हते. दुसऱ्या आणि तिसऱ्या सामन्यात वैभव सूर्यवंशीला संधी मिळावी म्हणून संजू सॅमसनला बाहेर केले गेले. दरम्यान, गंभीरने संजू सॅमसनला बाहेर करण्यामागचे नेमके कारण काय? याबाबत मोठे वक्तव्य केले आहे.




### गौतम गंभीर काय म्हणाला?

भारतीय संघाच्या पराभवानंतर पत्रकार परिषदेत बोलताना गौतम गंभीर म्हणाला, "पहिली गोष्ट म्हणजे, संजू सॅमसनला माझ्याकडून जे स्पष्टीकरण हवे होते ते दिले गेले आहे. ही पूर्णपणे एक प्रशिक्षक आणि खेळाडूमध्ये झालेली चर्चा आहे. दोघांमध्ये काय चर्चा झाली, हे बाहेर सांगता येणार नाही. स्पष्टतेबद्दल बोलायचे झाले तर आम्ही संजूबाबत पूर्णपणे स्पष्ट आहोत. तो टी-२० वर्ल्डकप विजयाचा हिरो आहे. पण कधी-कधी एखाद्या विशिष्ट खेळाडूचा फॉर्म पाहणेही तितकेच गरजेचे असते."

तसेच तो पुढे म्हणाला, की "असा कुठलाही नियम नाही की, तो या मालिकेत पुनरागमन करू शकणार नाही. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये निकाल महत्त्वाचा असतो. आम्हाला जे कॉम्बिनेशन योग्य वाटते, आम्ही त्याच कॉम्बिनेशनसह मैदानात उतरतो. माझा नेहमी ठाम विश्वास राहिला आहे, की प्रत्येकाला संघात आपले स्थान निर्माण करावे लागते. प्रत्येकाला भारतीय संघासाठी खेळण्याचा हक्क कमवावा लागतो."

भारताचा संघ आयर्लंड दौऱ्यावर रवाना टी-२० वर्ल्ड चॅम्पियन संघ म्हणून रवाना झाला होता. पण या दौऱ्यावर जाण्याआधी भारतीय संघात मोठे बदल पाहायला मिळाले होते. सूर्यकुमार यादवला कर्णधारपदावरून काढले आणि संघाबाहेर केले. तर त्याच्या जागी श्रेयस अय्यरकडे नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली. या दौऱ्यासाठी वैभव सूर्यवंशीलाही संघात स्थान दिले गेले. पण त्याला पदार्पणाची संधी मिळाली नव्हती. ही मालिका भारताने २-० ने गमावली. त्यानंतर इंग्लंड दौऱ्यावर पहिल्या सामन्यात संजू सॅमसन फ्लॉप ठरल्यानंतर दुसऱ्या आणि तिसऱ्या सामन्यात त्याला प्लेईंग ११ मध्ये स्थान दिले गेले नव्हते. त्याच्याजागी वैभव सूर्यवंशीला स्थान देण्यात आले. ही मालिका झाल्यानंतर भारतीय संघ झिम्बाब्वे दौऱ्यावर जाणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. पण या मालिकेसाठी संजूला संघात स्थान देण्यात आलेले नाही. त्याला विश्रांती देण्यात आली आहे, असे म्हटले जात आहे. पण एकच फॉरमॅट खेळत असलेल्या खेळाडूला विश्रांती कशाला? नक्की विश्रांती दिली आहे की डच्चू? असा सवाल उपस्थित केला जाऊ लागला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# ‘गुगल’ची नोकरी सोडून २३ वर्षांची तरुणी झाली उद्योजिका

## आशनाने कसा उभारला कोट्यवधींचा एआय स्टार्टअप वाचा एका क्लिकवर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चांगला पगार आणि आर्थिक सुरक्षितता देणारा गुगलचा जॉब आशनाने का सोडला? ‘Bounty’ स्टार्टअप आणि ‘० ते १’ पॉडकास्टच्या माध्यमातून तिने टेक जगतात कशी ओळख निर्माण केली? जाणून घेऊया.

कॉलेजचे शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच गुगल सारख्या कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअरची नोकरी मिळाली, तर कोणीही स्वतःला नशीबवान समजेल. मात्र, २३ वर्षीय आशना दोशी हिची कहाणी यापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. तिने जॉर्जिया टेक विद्यापीठातून आपले शिक्षण पूर्ण केले. जागतिक मंदीच्या काळातही ‘गुगल’ची पहिली नोकरी नाकारून तिने मोठा धोका पत्करला. नंतर तिला तिच्या आवडीच्या ठिकाणी म्हणजेच न्यूयॉर्कमध्ये पोस्टिंग मिळाले. परंतु काही काळातच तिने या ‘ड्रीम जॉब’चा कायमचा त्याग केला.

आशनाचा असा विश्वास आहे, की भरघोस पगार आणि आर्थिक सुरक्षितता चांगली वाटते, पण कधी-कधी ती एका चक्रव्यूहासारखी (सापळा) बनते. ‘गुगल’मध्ये काम करताना तिला जाणीव झाली, की ती एका खूप मोठ्या मशीनचा केवळ एक छोटासा भाग बनून राहिली आहे. तिच्या मनाला काहीतरी मोठे आणि कल्पक करण्याची ओढ लागली होती. याच विचाराने तिला कोडिंगच्या जगातून बाहेर काढले. आज ती एक यशस्वी पॉडकास्टर आणि एका नव्या एआय स्टार्टअपची को-फाउंडर बनली आहे.

**सक्सेस स्टोरी**



फेब्रुवारी २०२४ मध्ये ‘गुगल’ने आशनाला कॅलिफोर्नियासाठी नोकरीची ऑफर दिली होती. त्यावेळी टेक मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात कर्मचारी कपात सुरू होती. मात्र, आशनाला न्यूयॉर्कमध्ये काम करायचे होते. तिने धाडस दाखवून ती ऑफर नाकारली. आशनाने यूट्यूब म्युझिकपासून ते सिक्युरिटी इन्फ्रास्ट्रक्चर आणि एआयच्या इंटरसेक्शनपर्यंत अनेक महत्त्वाच्या विभागांवर काम केले.

### ‘० ते १’ पॉडकास्टची यशोगाथा

आपल्या कल्पकतेची भूक भागविण्यासाठी आशनाने २०२५ च्या सुरुवातीला एक ‘साइड प्रोजेक्ट’ म्हणून ‘० ते १’ नावाचा पॉडकास्ट सुरू केला. ‘बिग टेक’ कंपन्यांमध्ये काम करणारे तिचे सहकारी यामध्ये को-होस्ट बनले. या पॉडकास्टच्या माध्यमातून तिने जगभरातील टेक लीडर्स, स्टार्टअप फाउंडर्स आणि क्रिएटर्सचा प्रवास लोकांसमोर आणण्यास सुरुवात केली. सोशल मीडिया नेटवर्किंगच्या जोरावर सुरू झालेल्या या पॉडकास्टने अवघ्या एक वर्षात यूट्यूबवर एक लाखापेक्षा जास्त व्ह्यूज मिळविले. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे यामुळे आशनाचा ॲमेझॉन आणि मायक्रोसॉफ्टसारख्या टेक दिग्गजांच्या वरिष्ठ नेत्यांपर्यंत थेट संपर्क झाला.

### ‘Bounty’ एआय स्टार्टअपची स्थापना

पॉडकास्टच्या यशाने आणि मोठ्या दिग्गजांशी झालेल्या संवादाने आशनामधील उद्योजिका जागी केली. कॉर्पोरेट क्षेत्राच्या संथ गतीपेक्षा स्वतः निर्णय घेण्याचे आणि वेगाने काम करण्याचे स्वातंत्र्य तिला हवे होते. परिणामी, मे २०२६ मध्ये तिने ‘गुगल’चा राजीनामा दिला. आता आशना तिच्या पॉडकास्ट को-होस्टसोबत मिळून ‘Bounty’ नावाचा एआय स्टार्टअप उभारत आहे. हे एक ‘रिझल्ट-बेस्ड एआय मार्केटप्लेस’ आहे, जे कंपन्यांना लीड जनरेशन, आउटरीच आणि रिक्रूटमेंटसारखी कामे आउटसोर्स करण्याची सुविधा देते.



## कुरकुरीत मूगडाळ टोस्ट; सकाळच्या नाश्त्यासाठी झटपट रेसिपी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सकाळच्या नाश्त्यात रोज काहीतरी वेगळं आणि पौष्टिक खायचं असेल तर मूगडाळ टोस्ट हा उत्तम पर्याय आहे. प्रथिनांनी भरपूर असलेली मूगडाळ, भाज्यांचा समावेश आणि कमी वेळेत तयार होणारी ही रेसिपी मुलांच्या डब्यासाठी तसेच सायंकाळच्या हलक्या खाण्यासाठीही योग्य ठरते.

**साहित्य :**

१ कप भिजवलेली मूगडाळ
१/२ कांदा (बारीक चिरलेला)
१/४ कप किसलेले गाजर
१/४ कप किसलेली ढोबळी मिरची
२ हिरव्या मिरच्या
१ इंच आले
१ टेबलस्पून तूप
४ ब्रेड स्लाइस
१/२ टीस्पून लाल तिखट
१/२ टीस्पून धणेपूड
१/४ टीस्पून हळद
चवीनुसार मीठ
१ टेबलस्पून बारीक चिरलेली कोथिंबीर
चिमूटभर हिंग

**कृती :**

स्टेप १ : पीठ तयार करा

मिक्सरच्या भांड्यात भिजवलेली मूगडाळ, हिरवी मिरची आणि आलं घालून गुळगुळीत पीठ तयार करा.

स्टेप २ : भाज्या मिसळा

या पिठात हिंग, कांदा, ढोबळी मिरची, गाजर, लाल तिखट, हळद, धणेपूड, मीठ आणि कोथिंबीर घालून मिश्रण चांगले एकजीव करा.

स्टेप ३ : ब्रेडवर मिश्रण लावा

तवा गरम करून त्यावर थोडे तूप लावा. ब्रेडच्या एका बाजूला तयार मिश्रण समान पसरवा आणि ती बाजू तव्यावर ठेवा.

स्टेप ४ : दोन्ही बाजूंनी भाजा

ब्रेडच्या दुसऱ्या बाजूलाही मिश्रण लावून थोडे तूप घाला. दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत भाजून घ्या.

स्टेप ५ : सर्व्ह करा

तयार टोस्टचे तुकडे करून हिरवी चटणी किंवा टोमॅटो सॉसबरोबर गरमागरम सर्व्ह करा.

**टिप्स :**

मूगडाळ किमान ३ ते ४ तास भिजवून वापरल्यास पीठ अधिक मऊ होते.

अधिक पौष्टिकतेसाठी बीटरूट, स्वीट कॉर्न किंवा पालकही घालू शकता.

मुलांसाठी बनवत असाल तर हिरव्या मिरचीचे प्रमाण कमी ठेवा.

ब्रेडऐवजी मल्टीग्रेन किंवा ब्राउन ब्रेड वापरल्यास रेसिपी अधिक हेल्दी होते.

तूपाऐवजी बटर किंवा कमी तेल वापरूनही टोस्ट भाजू शकता.

# पोट होईल झटक्यात साफ! गॅस, अपचनही होणार नाही

## रोज फक्त ‘हे’ १ फळ खा, शरीरात दिसतील आश्चर्यकारक बदल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


तुम्हालाही दररोज पोटात गॅस होणे, बद्धकोष्ठता किंवा अपचन यांसारख्या समस्यांचा त्रास होतो का? जर होय, तर पपई हा त्यावर एक उत्तम आणि सोपा उपाय ठरू शकतो. पपईमध्ये असलेले खास एन्झाइम अन्न लवकर पचवण्यास आणि पचनसंस्था मजबूत करण्यास मदत करतात. मात्र, आरोग्यासाठी याचे फायदे इतक्यावरच थांबत नाहीत. त्वचेची चमक वाढवण्यापासून ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापर्यंत पपई शरीरासाठी संरक्षण कवचासारखे काम करते. पाण्याचे प्रमाण जास्त असलेल्या पपईमध्ये फायबर, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात, जे पचन सुधारतात आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात.

आयुर्वेदतज्ज्ञ आचार्य बालकृष्ण यांच्या मते पपई हा औषधी गुणधर्मांनी भरलेला फल आहे, जो पोटापासून आतड्यांपर्यंत स्वच्छता करण्यास मदत करतो. ज्यांना अन्न सहज पचत नाही त्यांनी दररोज जेवणानंतर १०० ग्रॅम पपई खावी. ज्यांचे पचन कमजोर असते त्यांनी सकाळी रिकाम्या पोटी पपईचे सेवन करावे, त्यामुळे फायदा होऊ शकतो. चला तर मग, तज्ज्ञांकडून जाणून घेऊया पपई खाल्ल्याने आरोग्याला कोणते फायदे होतात.

### पचनासाठी पपई अमृतासारखी कशी ठरते?

पपईमध्ये पपेन नावाचे एन्झाइम असते, जे अन्न पचवण्यास मदत करते. ज्यांना अपचन, गॅस किंवा बद्धकोष्ठतेची समस्या असते, त्यांच्यासाठी पपई फायदेशीर ठरू शकते. तज्ज्ञांच्या मते नियमित पपई खाल्ल्याने जुनाट बद्धकोष्ठतेतही आराम मिळू शकतो.





जर्नल ऑफ मेडिकल फूड आणि यू. एस. नॅशनल इन्स्टिट्यूट्स ऑफ हेल्थ (एनआयएच) यांच्या संशोधनानुसार जुनाट बद्धकोष्ठता आणि इरिटेबल बोवेल सिंड्रोम (आयबीएस) असलेल्या रुग्णांवर करण्यात आलेल्या क्लिनिकल चाचणीत असे आढळले, की ज्यांना नियमितपणे पपईचा अर्क देण्यात आला त्यांच्यात सकारात्मक बदल दिसून आले. मेडिकल न्यूज टूडेच्या माहितीनुसार पपईचे सेवन केल्याने शौचास जाण्याची नियमितता सुधारली. मलाचा कडकपणा कमी झाला आणि गंभीर बद्धकोष्ठता तसेच पोट फुगण्याच्या समस्येत ७० टक्क्यांपर्यंत घट नोंदविली गेली.

### पपईचे आरोग्यासाठी फायदे

पपईचे सेवन शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी हे फळ उपयुक्त ठरते. पपईमध्ये सुमारे ८८ टक्के पाणी असते, त्यामुळे ती शरीरात पाण्याची कमतरता होऊ देत नाही. याचे सेवन शरीराला थंडावा देण्यास आणि डिहायड्रेशनपासून संरक्षण करण्यास मदत करू शकते.

पपईचे सेवन शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी हे फळ उपयुक्त ठरते. पपईमध्ये सुमारे ८८ टक्के पाणी असते, त्यामुळे ती शरीरात पाण्याची कमतरता होऊ देत नाही. याचे सेवन शरीराला थंडावा देण्यास आणि डिहायड्रेशनपासून संरक्षण करण्यास मदत करू शकते. पपईमध्ये असलेले फायबर, पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स कोलेस्टेरॉलची पातळी संतुलित ठेवण्यास मदत करू शकतात. त्यामुळे हृदयाचे आरोग्य सुधारू शकते आणि हृदयविकारांचा धोका कमी होण्यास मदत होऊ शकते. व्हिटॅमिन ए ने समृद्ध असलेली पपई डोळ्यांच्या आरोग्यासाठीही फायदेशीर मानली जाते. तिचे सेवन डोळ्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यास आणि डोळे निरोगी ठेवण्यास मदत करू शकते.

### पपई खाण्याची योग्य वेळ कोणती?

तज्ज्ञांच्या मते जर पचन सुधारण्यासाठी पपई खात असाल तर सकाळी रिकाम्या पोटी तिचे सेवन करणे फायदेशीर ठरू शकते. तसेच काही लोक नाश्त्यामध्ये किंवा दुपारच्या जेवणानंतरही पपई खाऊ शकतात.



## पती-पत्नी : आयुष्याचे शेवटचे सोबती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लग्न म्हणजे फक्त फोटोमध्ये हसणाऱ्या दोन चेहऱ्यांची गोष्ट नाही. ते एका घरात राहणाऱ्या दोन व्यक्तींची कहाणी आहे, ज्या हजारो वेळा तुटतात, पण जगाला न कळता पुन्हा स्वतःला जोडून घेतात.

पती-पत्नीच्या नात्यात फक्त प्रेमच नसते. त्यात राग असतो, अहंकार असतो, दुःख असते. असेही दिवस येतात की दोघेही एकमेकांशी बोलत नाहीत. पत्नीच्या मनात वेदना असते, की ‘हे कधीच बदलणार नाहीत.’ तर पतीच्या मनात खंत असते, की ‘ही मला कधीच समजून घेत नाही.’ पण गंमत बघा...

तोच पती उशिरा घरी आला की पत्नी दाराच्या आवाजाने जागी होते. आणि तोच पती रागात असला तरी पत्नीने जेवले नाही हे कळल्यावर तिच्यासमोर ताट वाढतो. यालाच विवाह म्हणतात.

मुले लहान असताना घर गजबजलेले असते. आई-वडील स्वतःला मुलांच्या शिक्षणात, लग्नात, नोकरीत, नातवंडांमध्ये पूर्णपणे झोकून देतात. पण एक दिवस मुले आपापल्या आयुष्यात रमून जातात. हळूहळू घर रिकामे होते. आणि मग फक्त दोघेच उरतात.

एकेकाळी त्रासदायक वाटणारे घोरणे, एखाद्या दिवशी ऐकू आले नाही तर डोळे पाणावतात. ‘इतके बोलू नकोस’ म्हणून ज्याला रागावले होते, तो आवाज कायमचा शांत झाला तर घराच्या भिंतीसुद्धा ओसाड वाटतात. एखादा माणूस गेल्यावर सांत्वनासाठी अनेकजण येतात. पण रात्री पलंगावरील रिकामी जागा कोणी भरून काढू शकत नाही. औषध देणारा हात, ‘जेवलास/जेवलीस का?’ असे विचारणारा आवाज, रागामागे दडलेली काळजी दाखवणारे डोळे हे सगळं परत आणता येत नाही.

**म्हणून लक्षात ठेवा...**

सर्वोत्तम जोडपे ते नसते जे कधीच भांडत नाही. सर्वोत्तम जोडपे ते असते जे भांडणानंतरही एकमेकांची साथ सोडत नाही. वैवाहिक जीवनात प्रेमापेक्षा समजूतदारपणा मोठा असतो. समजूतदारपणापेक्षा संयम मोठा असतो. आणि संयमापेक्षाही मोठे असते ते मन, जे शेवटपर्यंत एकत्र राहण्याचा निर्णय घेते. खोडकरपणा, लाज, भांडणे, शांतता, संघर्ष, आनंद, अश्रू, हसू, तडजोड या सगळ्यांनी मिळून विवाह पवित्र बनतो. आपला जोडीदार जीवंत असतानाच त्याची किंमत ओळखा. कारण जीवंतपणी दिलेला सन्मान हा मृत्यूनंतर गाळलेल्या अश्रूंहून अधिक पवित्र असतो.

### हे नेहमी लक्षात ठेवा

आयुष्यात परिपूर्ण जोडीदार कधीच मिळत नाही. पण तुमच्या अपूर्णता स्वीकारून शेवटपर्यंत तुमची साथ देणारा जोडीदार मिळणे, याहून मोठे भाग्य दुसरे नाही.

# हवाई जहाज के इंजन पर मुर्गी क्यू फेके जाते है?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपने अकसर सुना होगा कि हवाई जहाज के इंजन पर मुर्गी फेंकी जाती है। क्या आप जानते हैं इसके पीछे कौन सा वैज्ञानिक कारण छिपा है? दरअसल, विमानन इंडस्ट्री में सुरक्षा को सर्वोपरि रखा जाता है।

टेकऑफ या लैंडिंग के दौरान बहुत बार पक्षी विमान से टकरा जाते हैं, जिससे जानमाल के नुकसान की संभावना रहती है। ऐसे में इंजीनियर ‘चिकन गन’ नामक विशेष मशीन की मदद से असली मुर्गी को विमान के विंग्स और इंजन पर दागते हैं। इसका उद्देश्य बर्ड स्ट्राइक की स्थिति में विमान की मजबूती और सुरक्षा की जांच करना है।



### क्या है बर्ड स्ट्राइक टेस्ट?

– जब हवाई जहाज उड़ान या लैंडिंग के समय पक्षियों के टकराने से दुर्घटना की संभावना रहती है।
– इससे इंजन बंद हो सकता है, विंडशील्ड टूट सकता है या फ्लाइट क्रैश हो सकती है।
– ऐसे में विमान के इंजीनियर, चिकन गन नामक मशीन से असली मुर्गे को तेज़ गति से विमान के इंजन और विंग्स पर दागते हैं।
– इसका उद्देश्य यह देखना होता है कि असली बर्ड हिट की स्थिति में इंजन या विमान कितनी क्षति झेल सकता है।

### क्यों फेंकी जाती है असली मुर्गी?

– मुर्गी की शारीरिक बनावट, वजन और मांस पक्षियों जैसी होती है, इसलिए इसका उपयोग होता है।
– टेस्ट के बाद यह देखा जाता है कि इंजन या विंग्स पर कितना असर हुआ।
– यदि इंजन बर्ड हिट में दो मिनट तक कम से कम 75% थ्रस्ट के साथ काम करे, तभी उसकी सुरक्षा मान्य होती है।
– यह इंटरनेशनल सेफ्टी स्टैंडर्ड का हिस्सा है और जब तक यह टेस्ट पास न हो, विमान को उड़ान की अनुमति नहीं मिलती।

### क्यों चुनी जाती है मुर्गी?

– यह आसानी से उपलब्ध होती है, सस्ती होती है और टेस्ट के लिए आदर्श मानी जाती है।
हवाई जहाज के इंजन पर मुर्गी फेंकना यात्रियों की सुरक्षा का अहम परीक्षण है ताकि बर्ड स्ट्राइक जैसी घटनाओं में भी विमान सुरक्षित रह सके।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# शनी देवाची क्रूर दृष्टी कसे ओळखाल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनीचे नाव ऐकताच लोक घाबरतात. परंतु शनीला न्यायप्रिय ग्रह मानले जाते. शनी व्यक्तीला त्याच्या कर्मानुसार फळ देतात. वाईट कर्म करणाऱ्यांना शनी शिक्षा देतो. चांगले कर्म करणाऱ्यांवर शनी आपला आशीर्वाद देतो. म्हणूनच त्यांना न्यायाधीश म्हणतात. असे मानले जाते, की ज्या लोकांना शनीची शुभ दृष्टी असते, त्यांना कोणत्याही प्रकारची कमतरता भासत नाही. तर दुसरीकडे ज्याच्याकडे शनीची वक्रदृष्टी असते त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. असे मानले जाते, की जो कोणी शनीदेवाला क्रोधित करतो त्याला राजाहून रंक बनण्यास वेळ लागत नाही. यामुळेच लोकांना शनिदेवाला प्रसन्न करायचे असते. शनीच्या अशुभ प्रभावापासून दूर राहण्याचे अनेक उपाय आहेत. पण त्याआधी हे जाणून घेणे आवश्यक आहे की शनी तुमच्यावर प्रसन्न आहे की कोपला आहे.

ज्योतिषशास्त्रानुसार काही लक्षणांवरून आपण शनीची वाईट दृष्टी असल्याचे ओळखू शकतो. ज्योतिषशास्त्रानुसार शनिदेवाच्या अशुभ प्रभावामुळे व्यक्तीचे केस लवकर गळायला लागतात. परंतु सूर्याच्या अशुभ प्रभावामुळे देखील केस झपाट्याने गळतात. त्यामुळे अशा वेळी शनीला प्रसन्न करण्यासाठी व्रत आणि उपासना करावी. सूर्याला बलवान बनविण्यासाठी सकाळी नियमितपणे तांब्याच्या भांड्यात सूर्याला पाणी घालावे.

ज्योतिषांच्या मते जेव्हा एखाद्याचा शनी जड असतो तेव्हा कपाळाचे तेज कमी होऊ लागते. काही लोकांच्या कपाळावर काळेपणाही दिसू लागतो. तसे असेल तर तुम्ही सावध व्हावे. अशा परिस्थितीत तुमचा आदर कमी होऊ शकतो.

शनीच्या अशुभ प्रभावामुळे कुटुंब आणि व्यवसायात अडचणी येऊ लागतात. कामही बिघडू लागते. आगीमुळे तुमचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे, अशी लक्षणे दिसल्यास ताबडतोब शनिदेवाची प्रार्थना करावी आणि शनीला अनुकूल होण्यासाठी उपाय करावेत. जेव्हा शनी भारी असतो तेव्हा माणसाला तेलकट, मांसाहारी पदार्थ जास्त आवडतात. शुद्ध माणसाची आवडही मांस आणि दारूमध्ये वाढू लागते. जर एखाद्याची आवड या गोष्टींकडे जाऊ लागली तर त्याने विशेष काळजी घ्यावी आणि या गोष्टींपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

जेव्हा शनिदेवाचा अशुभ प्रभाव असतो तेव्हा माणसाच्या स्वभावात क्रोध आणि खोटेपणाची भावना वाढू लागते. तो धर्माच्या कार्यापासून विचलित होऊ लागतो. चुकीच्या सट्टेबाजीसारख्या वाईट सवयी एखाद्या व्यक्तीमध्ये विकसित होऊ लागतात. या सवयी माणसाला गरिबीकडे घेऊन जातात. वाईट कृत्यांसाठी शनी कठोर शिक्षा देतो.





## आपणास ठाऊक आहे का शनिदेवांची १६ वैशिष्ट्ये

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१) सूर्यपुत्र शनिदेव मृत्युलोकाचे असे अधिपती स्वामी आहेत जे वेळ आल्यावर माणसाला ज्याचा त्याचा चांगल्या किंवा वाईट कर्मांच्या आधारांवर दंड देऊन सुधारण्यासाठी प्रवृत्त करतात.
२) शनी हे आधुनिक काळातील न्यायाधीश आहेत आणि न्याय नेहमी न आवडणारा असतो म्हणूनच तो क्रूर मानला जातो.
३) शनिदेवाचा मूळ रंग काळा आहे ज्यावर अजून कोणता रंग चढतच नाही.
४) शनीचे धातू लोखण्डी आहेत जे सर्वात योग्य आणि शक्तिशाली आहे.
५) शनीच्या आवडणाऱ्या वस्तू तेल, कोळसा, लोखंड, काळे तीळ, उडीद, जोडे- चपला देणगी म्हणून दिल्या जातात.
६) शनीदेवांच्या स्थापनेत वेळ आणि श्रमांचे आंशिक दान हे सर्वश्रेष्ठ दान मानले गेले आहे.
७) शनिदेव हे अध्यात्माचे गुरु आहे कोणत्याही पूजा, उपासनेसाठी त्याचे फळ मिळविण्यासाठी शनी महाराजांची उपासना, पूजा करणे आवश्यक आहे.
८) श्री शनिदेव संस्थेचे स्वामी आहेत, त्यांचा कृपेशिवाय संयुक्त कुटुंबाची कल्पना करणे अशक्य आहे.
९) शनिदेव सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आध्यात्मिक, प्रशासकीय, शिक्षण, व्यवसाय इत्यादीमध्ये उंची देण्याचे काम करतात.
१०) शनिदेव रोगमुक्ती आणि आयुष्य वृद्धीची इच्छा पूर्ण करतात.
११) शनिदेव आजच्या युगातील कलियुगातील देव आहे.
१२) शनिदेवांचे शस्त्र - धनुष्य, बाण आणि त्रिशूळ आहेत.
१३) शनिदेवांपासून राजा ते रंकापर्यंत सर्वेच घाबरलेले आणि प्रभावित आहे.
१४) शनिदेव हे नश्वर जगतातील एक शाश्वत आणि असामान्य देव आहे.
१५) शनिदेवांचे वाहन गिधाड आणि रथ लोखंडाचे बनलेले आहेत.
१६) शनिदेवांचे अनेक नावे आहेत, त्यांचे कार्य क्षेत्र मोठं आणि पसरलेले आहे.

# हनुमानजींनी तुलसीदासजींना कुठे दर्शन दिले?

## जेथे तुलसीदासजींनी रामचरितमानस, हनुमान चालीसा रचली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात अनेक चमत्कारिक मंदिरे असून प्रत्येक मंदिराचे काही खास वैशिष्ट्य आहे. तसेच हनुमानजींनी तुलसीदासजींना दर्शन दिले आणि जेथे तुलसीदासजींनी रामचरितमानस आणि हनुमान चालीसा रचली त्या मंदिराबद्दल तुम्हाला माहिती आहे का? ते प्रसिद्ध मंदिर म्हणजे वाराणसीमधील (काशी) संकट मोचन हनुमानजी मंदिर होय.

### संकट मोचन मंदिर तुलसीदासजींनी बांधले होते

आपण ज्या विशेष मंदिराबद्दल माहिती घेत आहोत ते उत्तर प्रदेशातील वाराणसी शहरात आहे. या मंदिराचे नाव 'संकट मोचन हनुमान मंदिर' आहे. हे मंदिर १६ व्या शतकात संत तुलसीदासांनी बांधले होते. असे मानले जाते, की येथेच संत तुलसीदासांनी रामचरितमानस आणि हनुमान चालीसा रचली आणि नंतर हनुमानजींनी त्यांना या ठिकाणी दर्शन दिले. असे मानले जाते, की त्यांनी तुलसीदासजींना प्रभू श्रीरामजींना भेटण्यास मदत केली. नंतर तुलसीदासजींनी या ठिकाणी हनुमानजींचे मंदिर बांधले. नंतर हे मंदिर संकटमोचन मंदिर वाराणसी म्हणून ओळखले जाऊ लागले.

### संकटमोचन मंदिराची कथा आणि महत्त्वाचे तथ्य






गोस्वामी तुलसीदासजी आणि हनुमानजींबद्दलच्या अनेक मनोरंजक कथा लोकांमध्ये लोकप्रिय आहे. यातील एक श्रद्धा अशी आहे, की माता सीतेने हनुमानजींची प्रभू श्रीरामांवरील भक्ती पाहून त्यांना कलियुगाच्या अखेरीपर्यंत येथे राहून श्रीरामभक्तांना मदत करण्याचा आदेश दिला. असेही मानले जाते, की जेव्हा मुघल अकबर भारतावर राज्य करत होता तेव्हा तुलसीदासजींनाही भयंकर छळ सहन करावा लागला. या काळात हनुमानजी तुलसीदासजींना मदत करण्यासाठी अनेकवेळा आले होते. नंतर तुलसीदासजींनी हनुमानजींना समर्पित संकट मोचन मंदिर वाराणसी बांधले.

### पौराणिक आख्यायिका

मान्यतेनुसार या ठिकाणी जेव्हा गोस्वामी तुलसीदास रामचरितमानस रचत होते आणि अस्सी घाटावर त्याचे अध्याय पठण करत होते. यासोबतच ते श्रीरामांचे भजनही गात असत. तसेच तुलसीदासजी दररोज सकाळी पिंपळाच्या झाडाला पाणी घालत असत. एके दिवशी त्या पिंपळाच्या झाडावर बसलेल्या एका पिंपळाने त्यांना विचारले, की तुम्हाला प्रभू श्रीरामांना भेटायचे आहे का? यावर तुलसीदासजींनी विचारले की कसे? तेव्हा पिंपळाने उत्तर दिले, की हनुमानजी भेट आयोजित करतील. त्यांनी असेही सांगितले, की तुमची श्रीराम कथा ऐकण्यासाठी दररोज हनुमानजी वृद्ध कुष्ठरोगी रूप घेऊन येतात. तेच भक्त हनुमानजी आहेत. परत तुलसीदास नियमितपणे श्रीराम कथा वाचू लागले तसेच हे ऐकून, पुढच्या वेळी जेव्हा सर्वजण निघून गेले तेव्हा तुलसीदास श्रीराम कथा सांगून त्या वृद्धाच्या मागे जाऊ लागले. हनुमानजींना समजले, की तुलसीदास त्यांच्यामागे येत आहे, म्हणून ते थांबले आणि तुलसीदासजी त्यांच्या पाया पडले आणि त्यांच्या खऱ्या स्वरूपात येण्याची प्रार्थना केली. यावर हनुमानजी त्यांच्या खऱ्या स्वरूपात त्यांच्यासमोर प्रकट झाले. त्यानंतर महर्षी तुलसीदासजींनी पहिल्यांदाच हनुमानजींसमोर त्यांनी लिहिलेली हनुमान चालीसा वाचली. त्यानंतर त्यांनी श्रीरामांना भेटण्याचा मार्ग विचारला. मग हनुमानजींनी त्यांना सांगितले, की प्रभू श्रीराम आणि त्यांचा धाकटा भाऊ लक्ष्मण त्यांना चित्रकूटमध्ये भेटतील. म्हणून त्यांना भेटण्यासाठी चित्रकूटला जावे. यानंतर हनुमानजींनी तुलसीदासजींच्या जीवनाला एक नवीन दिशा दिली आणि तेथून निघून गेले. तुलसीदासजींनी ज्या घाटावर हनुमानजी तुलसीदासजी रामचरितमानसाचे पठण ऐकण्यासाठी येत असत त्या घाटावर संकट मोचन मंदिर बांधले.

### संकटमोचन मंदिराबद्दल मनोरंजक माहिती

वाराणसीचे संकट मोचन हनुमानजींचे मंदिर साडेआठ एकरांत पसरलेले आहे. यामध्ये मुख्य मंदिर २ एकर जमिनीवर आहे आणि उर्वरित जमीन वनक्षेत्र आहे. हनुमानजींचे रूप मानली जाणारी माकडे या जंगलात फिरतात. तसेच मंदिरात भगवान हनुमानजींची मूर्ती अशा प्रकारे स्थापित करण्यात आली आहे, की त्यांचे मुख भगवान श्रीरामांकडे आहे आणि ते त्यांच्याकडे एकटक पाहत आहेत. भगवान हनुमानजींच्या मूर्तीसमोर श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मणजींच्या मूर्ती स्थापित करण्यात आल्या आहेत. तसेच संकटमोचन हनुमानजी मंदिरात भगवान हनुमानजींना प्रसाद म्हणून बेसनाचे लाडू अर्पण केले जातात. हे लाडू मंदिरातच देशी तुपातील विशेष घटकांसह तयार केले जातात.

येथे येणारे भाविक हनुमानजींना चमेलीच्या तेलात मिसळलेले सिंदूर अर्पण करतात. याशिवाय ते पिवळ्या रंगाचा झगा अर्पण करतात. असे केल्याने हनुमानजी त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करतात असे मानले जाते. येथे माकडांना केळी आणि इतर फळे खाऊ घालण्याची परंपरा देखील आहे. दरवर्षी एप्रिलमध्ये संकट मोचन हनुमान मंदिरात संगीत महोत्सव आयोजित केला जातो. देश-विदेशातील अनेक हनुमान मंडळे, गायक, कलाकार आपली प्रतिभा दाखवण्यासाठी येतात. याशिवाय श्रीराम नवमी, हनुमानजी जयंती, दीपावली या दिवशी विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात.

# महाराष्ट्रातील प्रसिद्ध आठ हनुमानजींची मंदिरे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्र हे विविध देवतांना समर्पित प्रसिद्ध हिंदू मंदिरांचे घर आहे. जर तुम्ही भगवान हनुमानजींचे उत्कट अनुयायी असाल, तर तुमच्या प्रवासाच्या योजनांमध्ये भर घालण्यासाठी महाराष्ट्रात अनेक हनुमानजींची मंदिरे आहेत. शक्ती, भक्ती आणि अटल निष्ठेच्या मूर्त स्वरूपाचे प्रतिबिंब असलेले भगवान हनुमानजी हे राज्यातील लाखो लोकांमध्ये श्रद्धेचे प्रतीक आहेत. या देवतेला समर्पित प्राचीन मंदिरे आणि आधुनिक मंदिरे राज्यभरात आहेत जेथे तुम्ही एक्सप्लोर करू शकता.

### महाराष्ट्रातील ८ हनुमानजींची मंदिरे

महाराष्ट्रातील विविध हनुमानजी मंदिरांमध्ये शांतता आणि दैवी ऊर्जा अनुभवण्यासाठी आध्यात्मिक भक्तांना विस्तृत ठिकाणे प्रदान करते.

### १) संकट मोचन हनुमानजी मंदिर

महाराष्ट्रातील सर्वांत प्रसिद्ध हनुमानजींच्या मंदिरांपैकी एक जे तुम्ही तुमच्या प्रवासाच्या योजनांमध्ये जोडू शकता ते म्हणजे संकट मोचन हनुमानजी मंदिर. दररोज मंदिर हजारो उत्साही भक्तांना आकर्षित करते जे भगवान हनुमानजींचे आशीर्वाद घेण्यासाठी येतात. मुंबईतील रहिवाशांच्या हृदयात हे मंदिर एक विशेष स्थान आहे. कारण ते जीवनात अडचणींना तोंड देणाऱ्यांना सांत्वन देते. 'संकट मोचन' अर्थात संकट दूर करणारे मारुती. येथे प्रार्थना केल्याने समस्या नाहीशा होतात, असे मानले जाते. मंदिराचा परिसर हिरवळीने व्यापलेला आहे. ज्यामुळे या ठिकाणाचे सौंदर्य वाढते.

स्थान : बी विंग, गाव देवी रोड, सर्वोदयनगर, भांडुप पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र- ४०००७८

वेळा : सकाळी ८ ते रात्री १०

### २) अंजनेरी हनुमानजी मंदिर

नाशिकमधील सिद्ध हनुमानजी मंदिर म्हणून ओळखले जाणारे अंजनेरी हनुमानजी मंदिर हे महाराष्ट्रातील आणखी एक लोकप्रिय हनुमानजी मंदिर आहे. हे मंदिर अंजनेरी टेकड्यांच्या माथ्यावर स्थित आहे आणि त्याचे पौराणिक महत्त्व आहे. ते भगवान हनुमानजींचे जन्मस्थान मानले जाते. ज्यामुळे ते सर्वांत पवित्र स्थळांपैकी एक बनते. हे मंदिर सुमारे ४२०० फूट उंचीवर बांधले गेले आहे आणि सह्याद्री पर्वतांचे निसर्गरम्य दृश्ये दाखवून तेथे पोहोचण्यासाठी तुम्हाला मध्यम ट्रेक करावा लागतो. हनुमानजींची जयंती दरम्यान मंदिर एका आध्यात्मिक स्थळात रूपांतरित होते.

स्थान : त्र्यंबकेश्वर रोड, अंजनेरी, महाराष्ट्र- ४२२२१३

वेळा : सकाळी ८ ते रात्री ८





### ३) श्री हनुमानजी मंदिर

पुण्यातील आणखी एक आध्यात्मिक स्थळ म्हणजे श्री हनुमानजी मंदिर. भगवान हनुमानजींना समर्पित आतील गर्भगृहाच्या पलीकडे, भगवान शनिदेवांना समर्पित मंदिरात आणखी एक मंदिर आहे. शनिवार पेठेच्या गजबजलेल्या परिसरात स्थित, हे मंदिर त्याच्या शांत आणि दिव्य वातावरणाने वेगळे दिसते. मंदिर देखील तुलनेने लहान आहे. परंतु त्याचे प्रभावी अस्तित्व आहे. मंगळवार आणि शनिवार या दोन दिवशी मंदिरात विशेष प्रार्थना करण्यासाठी भाविकांची गर्दी होते.

स्थान : हनुमानजी मित्र मंडळ, प्रेस कॉलनी, येरवडा, पुणे, महाराष्ट्र- ४११००६

वेळा : सकाळी ७ ते दुपारी १२ आणि सायंकाळी ५ ते रात्री १०

### ४) आळंदी येथील हनुमानजी मंदिर

पवित्र आळंदी शहरात महाराष्ट्रातील सर्वोत्तम हनुमानजी मंदिरांपैकी एक आहे. संत ज्ञानेश्वरांच्या समाधीला भेट देण्यासाठी या मंदिरात सामान्यतः भाविक येतात. येथील हनुमानजींची मूर्ती सुंदरपणे बनविलेली आहे आणि अनेक भाविक प्रार्थना करण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी येतात. मंदिराच्या आध्यात्मिक ऊर्जेव्यतिरिक्त ते त्याच्या नैसर्गिक वातावरणासाठी देखील प्रसिद्ध आहे. विशेषतः सुंदर इंद्रायणी नदीसह. देवतेला प्रार्थना केल्यानंतर तुम्ही नदीच्या काठावर आराम करू शकता किंवा पाण्यात डुबकी देखील घेऊ शकता.

स्थान : कांबळे वाडा, महाराष्ट्र- ४१२१०५

वेळा : सकाळी ६ ते रात्री ९

### ५) कोल्हापूर येथील श्री हनुमानजी मंदिर

कोल्हापूरमधील श्री हनुमानजी मंदिर हे महाराष्ट्रातील सर्वांत जुन्या हनुमानजी मंदिरांपैकी एक आहे. हे मंदिर महालक्ष्मी मंदिराजवळ आहे. ज्यामुळे ते यात्रेकरूंसाठी एक लोकप्रिय थांबा बनते. आध्यात्मिक महत्त्वाव्यतिरिक्त मंदिर त्याच्या अद्भुत इतिहासाने देखील वेगळे आहे. मंदिरात सुंदर वास्तुकला आणि एक मोठे अंगण आहे जेथे भाविक बसून ध्यान करू शकतात. येथील भगवान हनुमानजींची मूर्ती खूप शक्तिशाली असल्याचे म्हटले जाते. भाविकांचा असा विश्वास आहे की येथे पूजा केल्याने अडथळे दूर होतात आणि समृद्धी येते.

स्थान : स्टेशन रोड (एनएच-२०४), रेल्वे कॉलनी, शाहूपुरी, कोल्हापूर, महाराष्ट्र- ४१६००१

वेळ : सकाळी ७ ते रात्री ८

### ६) प्रतापगड हनुमानजी मंदिर

जर तुम्हाला साहसी प्रवासाची आवड असेल तर प्रतापगड हनुमानजी मंदिराला भेट देणे आवश्यक आहे. हे मंदिर किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर आहे. ज्यामुळे ते सर्वांत प्राचीन हनुमानजी मंदिरांपैकी एक बनले आहे. हे मंदिर भगवान हनुमानजींना समर्पित आहे आणि पश्चिम घाटाच्या सुंदर परिसरासाठी ओळखले जाते. असे मानले जाते, की हे ते ठिकाण आहे जेथे मराठा साम्राज्याचे योद्धे युद्धाला जाण्यापूर्वी आशीर्वाद घेत असत. तसेच किल्ल्याभोवती असलेल्या हनुमानजी मंदिराचे निसर्गरम्य स्थान हे पूजेपासून शांत सुटकेसाठी आणखी एक पैलू आहे.

स्थान : प्रतापगड, सातारा जिल्हा, महाराष्ट्र

वेळा : सकाळी ८ ते रात्री ८

### ७) हनुमानजी मंदिर

तुळजा भवानी मंदिराजवळ स्थित तुळजापूरमधील हनुमानजी मंदिर हे आणखी एक अवश्य भेट देण्याजोगे मंदिर आहे. तुळजा भवानी मंदिराच्या जवळ असल्याने तीर्थयात्रेदरम्यान ते एक महत्त्वाचे थांबे बनवते. मंदिराच्या आत, आतील गर्भगृह भगवान हनुमानजींना समर्पित आहे आणि मंदिराच्या आत इतर मंदिरे देखील आहेत, असे म्हटले जाते. मंदिराची वास्तुकला अगदी साधी आहे आणि मुख्य गाभाऱ्यासमोरील मोठा प्रार्थना कक्ष हे ठिकाण पाहण्यासारखे आहे. अनेकांचा असा विश्वास आहे की एकाच यात्रेदरम्यान तुळजा भवानी मंदिर आणि हनुमानजी मंदिराला भेट दिल्याने समृद्धी आणि सौभाग्य मिळते.

स्थान : शिवाजीनगर, तुळजापूर, महाराष्ट्र- ४१३६०१

वेळा : २४X७

### ८) गडहिंग्लजचे हनुमानजी मंदिर

शेवटी आपल्याकडे कोल्हापूरमध्ये गडहिंग्लज येथे हनुमानजी मंदिर आहे. हनुमानजींच्या जयंतीदरम्यान मंदिर भव्य उत्सवाच्या ठिकाणी रूपांतरित होते. या मंदिराचे एक मुख्य आकर्षण म्हणजे भगवान हनुमानजींची उंच मूर्ती जी भक्त आणि वास्तुकला उत्साही दोघांनाही आकर्षित करते. स्थानिकांच्या हृदयात मंदिराचे एक विशेष स्थान आहे, ते नियमितपणे आशीर्वाद घेण्यासाठी येथे येतात. झाडे आणि हिरवळीने वेढलेले हे मंदिर उत्सवादरम्यान देखील जीवंत होते. वैयक्तिक वाढीसाठी आध्यात्मिक शक्ती आणि आशीर्वाद मिळविणाऱ्यांसाठी हे एक परिपूर्ण ठिकाण आहे.

स्थान : गडहिंग्लज, महाराष्ट्र- ४१६५०२

वेळ : २४X७

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)